प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

लोकमत पुणे, शुक्रवार, दि. २५ डिसेंबर २०१५ ३

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी खरपुडी (ता. खेड) परिसरात श्रमदान करून नदीकाठचा परिसर स्वच्छ केला.

खरपुडीत विद्यार्थ्यांनी केले श्रमदान

दावडी : खेड तालुक्यातील दुर्गम भागातील खरपुडी येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुमारे १५४ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांतर्गत श्रमदानातून पर्यटनदृष्ट्या विकासकामे राबवली.

उत्तर पुणे जिल्ह्यात खरपुडी येथील धोंडोबा देवस्थान प्रसिद्ध आहे. भीमा नदीच्या काठाला देवस्थानची ५ एकर जागा आहे. ती जा विकसित केली तर गावाचा धार्मिक व पर्यटनाच्यांचा आर्थिक विकास होऊ शकतो या हेतूने विद्यार्थ्यांनी श्रमदान केले. या प्रसंगी सरपंच अनिता गाडे, बंडोबा गाडे, संदीप गाडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुकुक, प्रा. गोविंद मुकुक, डॉ. महेश घाडगे, प्रा. धनंजय वाघ उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी संस्था अध्यक्ष जॉइ. देवेंद्र बुट्टेपाटील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले, की राष्ट्रीय सेवा योजना विभागाची दिवाळी श्रमसंस्कार शिबिरे ही सामाजिकदृष्ट्या विद्यार्थ्यांची आयुष्य घडवणारी प्रयोगशाळा असून, विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा करून घेताना स्वत:सहीत नवनव्या शक्यतांचा शोध घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करायला हवा.

या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड पंचायत समितीचे उपसभापती सतीश राळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अनिलबाबा राळे, सरपंच अनिता गाडे, उपसरपंच बंडोबा गाडे, दशरथ गाडे, संदीप गाडे, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य जी. बी. शिंदे, रवींद्र गाडे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बुट्टेपाटील म्हणाले, या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाजाकडे डोळसपणे पाहायला शिकावे. जेणेकरून आपल्याला जपण्याचा सुसंस्कारपणा ही शिबिरे निमित्त ठरतील. प्रास्ताविक प्रा. दिलीप मुकुक यांनी केले. सुखसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार सरपंच अनिता गाडे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख